# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थाप्रित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in    दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४  email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./२४६६ /२०२२    दि. १४/०७/२०२२

## परिपत्रक

**विषय:- पुरपरिस्थितीवर उचित प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून गडचिरोली जिल्हयातील महाविद्यालये दि.१४ जुलै २०२२ ते १६ जुलै २०२२ या कालावधीत बंद ठेवून संदर्भीय आदेशातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत..**

संदर्भ:- १. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे आदेश क्र.जि.का./क्र.कार्या-३/अका.आव्यक/कावि-६०३/२०२२ दि.१० जुलै २०२२.

२. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. गो.वि./आस्था./२३९९/२०२२, दि. १०/०७/२०२२.

३. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे आदेश क्र.जि.का./क्र.कार्या-३/अका.आव्यक/कावि-६४२/२०२२ दि.१३ जुलै २०२२.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत गडचिरोली जिल्हयातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना याद्वारे कळविण्यात येते की, गडचिरोली जिल्ह्यातील पूरपरिस्थितीवर उचित नियंत्रण मिळविण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत दि. ११ जुलै २०२२ चे ००.०१ ते १३ जुलै २०२२ चे २४.०० या कालावधीत संदर्भ क्र. १ च्या आदेशान्वये गडचिरोली जिल्ह्यातील आत्यावश्यक सेवा, आस्थापना वगळता शाळा, महाविद्यालये व इतर सर्व बाबी बंद करण्यात आले होते व त्यासंदर्भात संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

तथापि, गडचिरोली जिल्ह्यातील सध्यस्थितीची पूरपरिस्थिती लक्षात घेता संदर्भ क्र. १ मध्ये नमुद कालावधी दि. १६/०७/२०२२ चे २४.०० वाजेपर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने संदर्भीय आदेशांचे अवलोकन करुन त्यांमधील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**संलग्न:-** संदर्भिय आदेश

14.7.2022

**(डॉ. अनिल चिताडे )**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली
४. मा. प्राचार्य, गडचिरोली जिल्हयातील सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
५. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
६. आस्थापना विभाग (नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./२३९९/२०२२

दि.१०/०७/२०२२

## परिपत्रक

**विषय:- पुरपरिस्थितीवर उचित प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून गडचिरोली जिल्हयातील महाविद्यालये दि.११ जुलै २०२२ ते १३ जुलै २०२२ या कालावधीत बंद ठेवून संदर्भीय आदेशातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत..**

**संदर्भ:-** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे आदेश क्र.जि.का./क्र.कार्या-3/अका.आव्यक/कावि-603/2022 दि.10 जुलै 2022

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत गडचिरोली जिल्हयातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना याद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,गडचिरोली यांचे संदर्भीय आदेशानुसार सध्या मान्सून कालावधी सुरू असून मागील ३ दिवसांपासून गडचिरोली जिल्हयात विशेषत: दक्षिण व दक्षिण-पूर्व भागात मुसळधार पाऊसासह अतिवृष्टी झालेली असून गोदावरी, प्राणहिता,बांडिया,पर्लकोटा,पामुलगौतम, इंद्रावती नद्यांच्या पाण्याची पातळी ही वाढत असून सदर पाणलोट क्षेत्रातील नद्या व नाल्यांना पूर आल्याने प्रतिबंधात्मक बाब म्हणून गडचिरोली जिल्हयातील महाविद्यालये दि.११ जुलै २०२२ चे ००.०१ ते १३ जुलै २०२२ चे २४.०० या कालावधीत बंद ठेवून संदर्भीय पत्रातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**संलग्न:-** संदर्भिय आदेश

10.7.2022

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरुंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली
४. मा. प्राचार्य, गडचिरोली जिल्हयातील सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.
५. उपकुलसचिव, आस्थापना विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
६. सिस्टीम अॅनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

महाराष्ट्र शासन
# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली
तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली-442605
▸ टोल फ्री क्रमांक :1077 ▸ हॉटलाईन क्र.: 2007 ▸ दूरध्वनी क्र.: 07132-222031,30,35
▸ मोबाईल क्र.: 9423911077 ▸ E-mail id :dmcellgadchiroli@gmail.com

जि.का./क्र.कार्या-3/अका.आव्यक/कावि- 642 /2022 दिनांक : 13 जुलै, 2022

संदर्भ- या कार्यालयाचे आदेश क्रमांक कार्या-3/अका-आव्यक/कावी-603/2022 दिनांक 10 जुलै,2022

**आदेश...**

गडचिरोली जिल्हयातील पूरपरिस्थितीवर उचित नियंत्रण मिळविण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत दिनांक 11 जुलै,2022 ते 13 जुलै,2022 चे 24.00 वाजेपर्यंत उक्त संदर्भियआदेशान्वये जिल्हयातील अत्यावश्यक सेवा,आस्थापना वगळता शाळा, महाविद्यालय व इतर सर्व बाबी बंद करण्यात आले होते.

तथापी गडचिरोली जिल्हयातील सध्यस्थितीची पूरपरिस्थिती लक्षात घेता उपरोक्त संदर्भिय आदेशात नमुद केलेल्या कालावधीत वाढ करण्यात येवुन सदर संदर्भिय आदेश **दिनांक 16/07/2022 चे 24.00 वाजेपर्यंत अंमलात राहील.**

सदरचे आदेश आज दिनांक 13/07/2022 रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

Office of the District Magistrate Gadchiroli

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्था पन प्राधिकरण,गडचिरोली

**प्रतिलिपि- माहितीस्तव सादर .**

1) मा .मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-32
2) मा.प्रधान सचिव,आपत्ती व्यवस्थापन,महसुल व वनविभाग, मंत्रालय,मुंबई-32
3) मा. विभागीय आयुक्त, नागपूर यांना माहितीस सविनय सादर
4) मा.संचालक ,आपत्ती व्यवस्थापन,महसुल व वनविभाग, मंत्रालय ,मुंबई-32

**माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित**

5)पोलीस अधिक्षक,गडचिरोली
6)मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,गडचिरोली
7) अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली/अहेरी
8) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी(सर्व)
9) पोलीस उपविभागीय अधिकारी (सर्व)
10) जिल्हा शल्य चिकीत्सक,गडचिरोली
11) जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.गडचिरोली
12) तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
13) गट विकास अधिकारी(सर्व)
14) जिल्हा माहिती अधिकारी गडचिरोली यांनी वरीलप्रमाणे बाब विनामुल्य प्रसिध्द करावी.
15) जिल्हा प्रशासन अधिकारी,नगर पालिका प्रशासन गडचिरोली
16) मुख्याधिकारी, नगर परिषदा/पंचायती सर्व
17) इतर सर्व संबधित विभाग-------------
18) स्थळ प्रत

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,गडचिरोली

महाराष्ट्र शासन
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली
तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली-४४२६०५
▸ टोल फ्री क्रमांक :१०७७ ▸ हॉटलाईन क्र.: २००७ ▸ दूरध्वनी क्र.: ०७१३२-२२२०३१/३५/३१,
▸ मोबाईल क्र.: ९४२३९११०७७ ▸ E-mail id :dmcellgadchiroli@gmail.com

सत्यमेव जयते

जि.का./क्र.कार्या-३/अका.आव्यक/कावि- ६०३/२०२२ दिनांक :- १० जुले, २०२२

# आदेश

**ज्याअर्थी,** सध्या मान्सून कालावधी सुरु असून मागील ३ दिवांपापासून गडचिरोली जिल्ह्यात विशेषत: दक्षिण व दक्षिण-पूर्व भागात मुसळधार पाऊससह अतिवृष्टी झालेली असून गोदावरी, प्राणहिता, बांडिया, पर्लकोटा, पामुलगोतम, इंद्रावती नद्यांच्या पाण्याची पातळी ही वाढत असून सदर पाणलोट क्षेत्रातील नद्या व नाल्यांना पूर आल्याने बरेच मार्ग बंद आहे.

**ज्याअर्थी,** भारतीय हवामान विभागाचे प्रादेशिक कार्यालय, नागपूर द्वारा आज दि. १० जुलै, २०२२ द्वारा प्रसारित हवामान संदेशानुसार पुढील ७२ तासात गडचिरोली जिल्ह्यात मुसळधार पाऊससह अत्याधिक पाऊसाची दाट शक्यता आहे.

**त्याअर्थी, मी संजय मीणा, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली** आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत पूरपरिस्थितीवर उचित प्रतिबंधात्मक उपाययोजनेतंर्गत गडचिरोली जिल्हा सीमाक्षेत्रामध्ये पुढीलप्रमाणे उपाययोजना **दिनांक ११ जुलै, २०२२ चे ००.०१ ते १३ जुलै, २०२२ चे २४.०० पर्यंत लागू करीत आहे.**

१) **प्रतिबंधित बाबी :-**

**सदर कालावधीत पुढील सेवा/कामे दिनांक १३ जुलै, २०२२ पर्यंत संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात प्रतिबंधित राहतील.**

i) **जिल्ह्यातील सर्व शाळा, विद्यालये, महाविद्यालये सदर कालावधीत बंद असतील.**
ii) या आदेशान्वये /मार्गदर्शक सूचनांन्वये परवानगी देण्यात आलेल्या आस्थापनांचा अपवाद वगळता इतर सर्व कँटीन (आतिथ्य) सेवा बंद राहतील.
iii) सर्व खाजगी कार्यालये, खाजगी आस्थापना बंद असतील.

२) खालीलप्रमाणे व्यवसायास परवानगी आहे.

**सदर कालावधीत अत्यावश्यक सेवेशी संबंधित दुकाने सुरु राहतील तर इतर दुकाने सदर** कालावधीत पूर्णत: बंद असतील. तथापि सर्व दुकानांची आवश्यक उचित खबरदारी घेणेचे जबाबदारी संबंधित दुकानमालकांची असेल.

a. अत्यावश्यक सेवा यामध्ये खालील बाबीचा समावेश असेल.

i. रूग्णालये तपासणी/ निदान केंद्रे, रूग्ण तपासणी केंद्र, वैद्यकीय विमा कार्यालय, औषध निर्माण कार्यशाळा, औषध निर्माण करण्याच्या कंपन्या, औषधी विक्री केंद्र आणि वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत आस्थापना आणि उपक्रम.
ii. पशुवैद्यकीय बाबी
iii. किराणामाल दुकान, भाजी विक्रीची दुकाने, डेअरी, बेकरी, मिठाई विक्रीची दुकाने, खाद्यपदार्थ विक्री केंद्र.

iv. कोल्ड स्टोरेज आणि वेअरहाऊसिंग सर्विसेस
v. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था- रेल्वे, टॅक्सी, ॲटोरिक्शा, सार्वजनिक वाहतूक बसेस
vi. स्थानिक प्रशासनाद्वारा करावयाची मान्सूनसंबंधी कामे
vii. स्थानिक संस्थाव्दारा पार पाडल्या जाणारी सर्व सार्वजनिक स्वरूपाची कामे
viii. टेलिकॉम क्षेत्राशी निगडीत देखभाल/दुरुस्ती इत्यादी कामे
ix. मालवाहतूक
x. पाणी पुरवठाशी निगडीत सेवा
xi. शेती क्षेत्राशी निगडीत सेवा
xii. ई- कॉमर्स (केवळ अत्यावश्यक सेवेशी संबंधित बाबींना परवानगी असेल)
xiii. प्रसार माध्यमे
xiv. पेट्रोल पंप, इंधन गॅस इ.
xv. स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारणाने अत्यावश्यक म्हणून ठरविलेल्या सेवा/बाबी
xvi. बँका

**३) सर्व विभागातील विभाग प्रमुखांनी त्यांचे विभागातील १०० टक्के कर्मचारी यांची कार्यालयात उपस्थिती अनिवार्य करावे.**

I. सर्व शासकीय व निम-शासकीय कार्यालये नियमितपणे सुरु असतील.

II. आपत्ती व्यवस्थापनातंर्गत वेळेवेर कोणत्याही विभागाचे मनुष्यबळ लागू शकते. सबब जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी हे आज दि.१० जुलै, २०२२ चे रात्रौ ११.५९ पर्यंत मुख्यालयी उपस्थित होतील, याची दक्षता घ्यावी.

सदरील आदेशाचे पालन न करणारी/ उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच भारतीय दंड संहिता १८६० नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**सदरचे आदेश आज दिनांक १०/०७/२०२२ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.**

Office of the ... Magistrate ... Gadchiroli

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली**

**प्रतिलिपी- माहितीस्तव सादर**

१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा. प्रधान सचिव, आपती व्यवस्थापन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
४) मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित**

५) पोलीस अधिक्षक, गडचिरोली
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली
७) अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली/अहेरी
८) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
९) पोलीस उपविभागीय अधिकारी (सर्व)

१०) जिल्हा शल्य चिकीत्सक,गडचिरोली
११) जिल्हा आरोग्य अधिकारी. जि. प. गडचिरोली
१२) तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
१३) गट विकास अधिकारी (सर्व)
१४) जिल्हा माहिती अधिकारी गडचिरोली यांनी वरीलप्रमाणे बाब विनामुल्य प्रसिद्ध करावी.
१५) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालिका प्रशासन गडचिरोली.
१६) मुख्याधिकारी, नगर परिषदा/ पंचायती सर्व
१७) इतर सर्व संबंधित विभाग ----------
१८) स्थळ प्रत

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली**